सन २०१३-१४ व २०१४-१५ मध्ये औद्योगिक प्रशिक्षण संस्थामधील प्रवेश प्रक्रिया नोंदणी शुल्क वाढ प्रकरणी चौकशी करण्यासाठी गठीत चौकशी समितीस दि. ३०/६/२०१८ पर्यंत मुदतवाढ देणेबाबत..

महाराष्ट्र शासन
कौशल्य विकास व उद्योजकता विभाग
शासन निर्णय क्रमांकः संकिर्ण-३३१५/प्र. क्र.३७० /व्यशि-३,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय विस्तार, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : ११ मे, २०१८.

वाचा:

१) कौशल्य विकास व उद्योजकता विभाग शासन निर्णय क्र. संकिर्ण-३३१५/प्र.क्र.३७०/व्यशि-३ दि. १०/१/२०१८.

२) सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, अमरावती तथा सदस्य सचिव, चौकशी समिती यांचे पत्र क्र. चौकशी समिती/२०१८/५५ दि. ४/४/२०१८.

प्रस्तावना:

व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील औद्योगिक प्रशिक्षण संस्थामध्ये सन २०१३-१४ व २०१४-१५ मधील प्रवेश प्रक्रिया नोंदणी शुल्क वाढ प्रकरणी चौकशी करण्यासाठी संदर्भ क्र. (१) येथील शासन निर्णयाअन्वये श्री. आनंद रायते, आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परिक्षा (CET), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली असून, सदर समितीस त्यांचा अहवाल तीन महिन्यात सादर करावा असे आदेशित केले होते. तथापि, सदर समितीचे सदस्य सचिव तथा सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, अमरावती यांनी संदर्भ क्र. (२) येथील दि. ४/४/२०१८ च्या पत्रान्वये सदर चौकशी समितीच्या कामकाजाकरिता दि. ३०/६/२०१८ पर्यंत मुदतवाढ मिळणेबाबत शासनास विनंती केली आहे. त्याअनुषंगाने चौकशी समितीस मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

शासन निर्णय :

शासन आता याव्दारे, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील औद्योगिक प्रशिक्षण संस्थामध्ये सन २०१३-१४ व २०१४-१५ मधील प्रवेश प्रक्रिया नोंदणी शुल्क वाढ प्रकरणी झालेली प्रशासकीय व वित्तीय अनियमितता, फसवणूक व निधीच्या गैरव्यवहाराबाबत या प्रकरणी सखोल चौकशी करण्यासाठी श्री. आनंद रायते, आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परिक्षा (CET), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे अध्यक्षतेखाली संदर्भाधिन (१) येथील दि. १०/१/२०१८ च्या

शासन निर्णयाअन्वये गठीत करण्यात आलेल्या चौकशी समितीस या संदर्भातील चौकशी करून अहवाल सादर करणेसाठी दि. ३०/६/२०१८ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०५१११६०४३६३४०३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Raghunath Barmu Patil

Digitally signed by Raghunath Barmu Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Skill Development and Ent.Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d1d3732393e2fe99e87265b79ea82fd977eb410b87cfdeefcec0d20bcfa04e3b, serialNumber=898bdf6826f8f62a787ac961772c882e939a8f53c4940d59757a918d3e05efbc, cn=Raghunath Barmu Patil
Date: 2018.05.11 16:03:25 +05'30'

(र.ब.पाटील)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१. आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परिक्षा (CET), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. वित्त विभागाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
३. सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, अमरावती.

प्रत,

१. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव.
२. मा. मंत्री, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग यांचे खाजगी सचिव.
३. मा. राज्यमंत्री, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग यांचे खाजगी सचिव.
४. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-३२
५. मा. अप्पर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
६. मा. सचिव, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
७. मा. उप सचिव (व्यशि), कौशल्य विकास व उद्योजकता विभाग यांचे स्विय सहायक.
८. संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई.
९. निवड नस्ती (व्यशि-३).